**फौ.कि.अर्ज.क्र.–५८/२०२३**

## <u>निशाणी – १८ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज अर्जदार हिने कौटूंबिक हिसांचार कायदा कलम १९ प्रमाणे मुलांची काळजी घेण्यासाठी पतीच्या घरापैकी एका घरामध्ये तिला राहण्यास परवानगी मिळावी यासाठी केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जादार कथन करते की, जाबदेणार यांनी तिच्याकडील दोन्ही मुले गोड बोलून फसवून त्याच्याकडे नेलेली आहेत व अर्जदार सध्या माहेरी वडीलांकडे राहते. अर्जदार मुलांसोबत नसल्यामुळे मुलांचे हाल होत आहेत. जाबदेणार यांची दोन घरे आहेत. अर्जदार हिच्या मुलाची सध्या तब्येत बरी नाही त्यामुळे अर्जदाराचे त्याच्यासोबत राहणे गरजेचे आहे. त्यापैकी गावातील एका घरामध्ये अर्जदार हिला राहण्याची परवानगी मिळावी. सबब, सदर अर्ज मंजूर करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. जाबदेणार यांनी सदर अर्जास म्हणणे देवून अर्जदाराचे कथन नाकारले आहे. जाबदेणार यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा मुलगा यशराज हा अर्जदार हिच्याकडे राहण्यास होता व अर्जदार हिने त्याला स्वतःहून जाबदेणार यांच्या घरी सोडले आहे व तो मुलगा स्वतःहून तिथे थांबला आहे. जाबदेणार हा मुलांना आणण्यासाठी कधीही गेला नव्हता तसेच, त्यांची मुलगी सानिका ही देखील अर्जदाराकडे गेली नव्हती. मुलाच्या आजारपणाचे उपचार देखील जाबदेणार करत आहेत व त्याची पुरेपूर काळजी घेत आहेत. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज व कथने वाचून पाहिली. दोन्ही विधिज्ञ यांचा युक्तीवाद विचारात घेतला. कौटूंबिक हिसांचार कायदा कलम १९ अन्वये एखाद्या महिलेस प्रथमदर्शनी कौटूंबिक हिसांचार झालेला आहे असे दिसून आल्यास सदर महिलेस तिच्या सासरच्या घरी राहण्यास परवानगी देता येते. प्रस्तुत प्रकरणामध्ये मुलांचा ताबा सध्या जाबदेणार यांच्याकडे असल्याचे दिसून येते. परंतु, अर्जदार हिने मुलांचा तात्पुरता ताबा मागितलेला दिसून येत नाही. तसेच, जाबदेणार यांनी मुलांचा ताबा बळजबरीने घेतला

आहे किंवा कसे हे देखील स्पष्ट होत नाही. अर्जदार ही सध्या वडीलांच्या घरी राहते. अर्जदार हिने जाबदेणार यांच्याकडे दोन घरे आहेत हे दाखवून दिलेले नाही. तसेच, तिच्या कथनांनुसार ती गावामधील घरात जरी राहण्यास गेली तरी तिचे मुले ही जाबदेणार यांच्यासोबत राहणार आहे. त्यामुळे मुळ अर्जाची चौकशी होवून निर्णय होईपर्यंत मुलांचा ताबा जाबदेणार यांच्याकडे राहणार आहे. त्यामुळे सदर अर्ज मंजुर केला तरी मुलांची काळजी घेण्याचा अर्जदाराचा हेतू साध्य होणार नाही. सबब, वरील सर्व चर्चेअंती मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. सदर अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

***सही/-***

**दि:२०/०२/२०२४** **(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**

७वे सह दि.न्या.क.स्तर तथा प्र.न्याय.,

वडगांव मावळ, पुणे.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **Shri. Sagar V. Ingale** |
| Name of the court | : | **Smt. Kirtee A. Deshpande** |
| | | **7th C.J.J.D. & J.M.F.C.,** |
| | | **Vadgaon Maval, Pune** |
| Judgment/order declared on | : | **20/02/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **20/02/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **20/02/2024** |